नगर परिषदा / नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका आणि नगर परिषद अध्यक्षांचा निवडणूक कार्यक्रम. २०१६-१७.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३४/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -३२.
दिनांक:- १७/१०/२०१६.

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व),
(मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे वगळून)

**विषय :- नगर परिषदा /नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका आणि नगर परिषद अध्यक्षांचा निवडणूक कार्यक्रम - २०१६-१७**

**संदर्भ** :- राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.२७/का-०६, दिनांक ३०/०८/२०१६.

**महोदय/महोदया,**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. ही जबाबदारी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने डिसेंबर-२०१६ ते फेब्रुवारी-२०१७ या कालावधीत मुदती संपणाऱ्या १९५ व नवनिर्मित १९ नगर परिषदा/नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका वेळेवर घेण्यासाठी खालील प्रमाणे सूचना / आदेश दिलेले आहेत :-

| | | |
|---|---|---|
| (i) | निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबत :- | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना पत्र अ.शा.प.क्रमांक- रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१९/का-६, दिनांक १९/०१/२०१६. |
| (ii) | प्रभाग रचनेबाबत :- | आदेश क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का-६, दिनांक १५/०६/२०१६. |
| (iii) | मतदार यादीच्या प्रभागनिहाय विभाजनाबाबत :- | आदेश क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.२७/का-६, दिनांक ३०/०८/२०१६. |

२. आयोगाच्या वरील आदेशाप्रमाणे दि.१०/०९/२०१६ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची अस्तित्वात असलेली मतदार यादी प्रभागनिहाय विभागून वापरावयाची आहे.

३. राज्य शासनाने "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६)" दिनांक १९/०५/२०१६ व दिनांक ३०/०८/२०१६ अन्वये नगर परिषदांमध्ये (नगर पंचायती वगळून) एकसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व तसेच नगर परिषदांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे. शासनाने दि.०४/१०/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अध्यक्ष पदाचे निवडणूक नियम, २०१६ शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहेत. त्यामधील तरतुदींनुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अध्यक्ष पदासाठी प्राप्त होणा-या नामनिर्देशनाबाबतची कार्यवाही करावी.

४. चंद्रपूर जिल्ह्यातील नवनिर्मित नागभीड नगर परिषदेप्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.३८८२/२०१६ मध्ये दि.२४/०८/२०१६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने By way of ad-interim order, it is directed that a elections to Nagar Parishad be not held, until further orders अशा दिलेल्या आदेशानुसार व पनवेल नगर परिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर करण्याबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने या दोनही नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम देण्यात आलेला नाही.

४.२ त्यामुळे आता मुदती संपणाऱ्या १९० नगर परिषदा आणि ४ नगर पंचायती तसेच नवनिर्मित २ नगर परिषदा व १६ नवनिर्मित नगर पंचायती अशा एकूण १९२ नगर परिषदा व २० नगर पंचायती तसेच मुदती संपणा-या १९० व २ नवनिर्मित नगर परिषदांच्या थेट अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम घेण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत. (निवडणुका असलेल्या नगर परिषदा व पंचायतींची एकत्रित यादी सोबतच्या अनुसूचीनुसार आहे.) :-

## आदेश

५.१ वर नमूद नगर परिषदा/नगर पंचायतींच्या सार्वत्रिक व नगर परिषदांच्या थेट अध्यक्ष पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम सोबतच्या परिशिष्ट- १, २, ३ व ४ आणि नगर परिषद / नगरपंचायतीची यादी अनुक्रमे परिशिष्ट-१-अ, २-अ, ३-अ, व ४-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निवडणुका असलेल्या नगरपरिषदा / नगर पंचायतींचे एकूण जिल्हे | नगर परिषदा / नगर पंचायतींची संख्या | जिल्हाधिकारी यांनी कार्यक्रम घोषित करावयाचा दिनांक | नामनिर्देशपत्राचा कालावधी | मतदानाची तारीख | परिशिष्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २५ जिल्हे | १४७ नगर परिषदा व १८ नगरपंचायती | १९/१०/२०१६ | २४/१०/२०१६ ते २९/१०/२०१६ | २७/११/२०१६ | १ व १-अ |
| २. | २ जिल्हे | १४ नगर परिषदा | ०७/११/२०१६ | ११/११/२०१६ ते १९/११/२०१६ | १४/१२/२०१६ | २ व २-अ |
| ३. | ४ जिल्हे | २० नगर परिषदा व २ नगर पंचायती | १५/११/२०१६ | १९/११/२०१६ ते २५/११/२०१६ | १८/१२/२०१६ | ३ व ३-अ |
| ४. | २ जिल्हे | ११ नगर परिषदा | ०३/१२/२०१६ | ०९/१२/२०१६ ते १७/१२/२०१६ | ०८/०१/२०१७ | ४ व ४-अ |

५.२ या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची राहील. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्यावेळी जी काही दक्षता व काळजी घेण्यात येते ती सर्व या निवडणुकांमध्ये घेणे आवश्यक असल्याने संबंधीत जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी त्याप्रमाणे नियोजन करावे.

५.३ ह्या निवडणुका संविधानातील तरतुदीनुसार पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

**(अ) मतदान केंद्राबाबत-**

(i) नगर परिषदांमध्ये एकसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व नगराध्यक्षांची थेट निवडणूक असल्याने प्रत्येक मतदारास कमीत कमी ३ व जास्तीत जास्त ४ मते द्यावी लागणार आहेत. म्हणून आयोगाने क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.२९/का-६, दि.०९/०९/२०१६ अन्वये नगरपरिषदांकरिता प्रत्येक मतदान केंद्राकरिता ८०० ते ८५० व नगर पंचायतीकरिता १२०० ते १४०० मतदार असावेत याबाबतचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांनी आवश्यक ती मतदान केंद्रे निश्चित करावीत. ही मतदान केंद्रे शक्यतो शासकीय इमारतींमध्ये असावीत. शासकीय इमारत उपलब्ध नसेल तर राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. रानिआ-२०१५/प्र.क्र.०९/प्रकल्प कक्ष, दिनांक २७/०५/२०१५ नुसार कार्यवाही करावी.

(ii) प्रत्येक मतदान केंद्रामध्ये आवश्यक त्या सोयी-सुविधा उदा. सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा, रॅम्प, सुरक्षा भिंत, इ.सुविधा असाव्यात. जर काही ठिकाणी आवश्यक त्या सुविधांचा अभाव असेल तर त्यांची निवडणुकीपूर्वी व्यवस्था करावी.

(iii) प्रत्येक मतदान केंद्र आदर्श व्हावे यासाठी आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.९/ प्रकल्प कक्ष, दि.२७/०५/२०१५ प्रमाणे काळजीपूर्वक प्रयत्न करावेत.

(iv) प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेर व नगर परिषद क्षेत्रामध्ये दर्शनीस्थळी प्रत्येक मतदाराने ३ किंवा ४ मते द्यावयाची आहेत याबाबतची पोस्टर्स जनजागृतीसाठी लावण्यात यावीत.

(v) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ठेवण्यासाठी स्ट्राँग रुमची व्यवस्था व मतमोजणीकरिता योग्य ती व्यवस्था करण्यात यावी.

(vi) कोणत्याही कारणास्तव मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी संबंधित ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

(ब) अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत -

(i) नगर परिषदांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व अध्यक्ष पदाची थेट निवडणूक लक्षात घेता जिल्हाधिकारी यांनी मतदान केंद्रांची संख्या निश्चित करून पुरेसे अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्त्या कराव्यात. उदा. निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी,मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी,झोनल अधिकारी, इत्यादी व त्याअनुषंगाने इतर सर्व व्यवस्था करण्यात यावी.उदा. पोलीस अधिकारी/ कर्मचारी, होमगार्ड इ. याबाबत आयोगाचे पत्र क्रशनिआ/नप-२०१६/प्र.क्र.३३/का-६, दिनांक २३/०९/२०१६ ची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

(ii) निवडणुकीचे काम करण्यासाठी आवश्यक तो अधिकारी / कर्मचारीवर्ग राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.एसईसी-१०९५/३०६/डेस्क-३, दि.०२/०३/१९९५ अन्वये अधिग्रहित करता येतो.

(iii) निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील. जर ह्या अधिकारी /कर्मचारी यांनी कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई केली तर त्यांच्याविरुध्द निलंबनासह सर्व प्रकारची प्रशासकीय कारवाई (Diciplinary Action with suspension) करण्याचे सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोग व त्यांच्यावतीने जिल्हाधिकारी यांना आहेत. जिल्हाधिकारी यांनी ही कारवाई आवश्यकतेप्रमाणे तातडीने करावी.भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्र.४/२००१/ जेएस-२, दिनांक ०७/०२/२००१ व आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दिनांक ०२/०८/२००६.)

(क) अधिकारी/कर्मचा-यांच्या प्रशिक्षणाबाबत-

जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कामासाठी नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक त्या सर्व विषयावर कमीत कमी २ वेळा योग्य ते प्रशिक्षण द्यावे. उदा :

(i) बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व नगराध्यक्षांची थेट निवडणूक,

(ii) प्रत्येक मतदारास द्याव्या लागणाऱ्या ३ किंवा ४ मतांसाठी मतदान यंत्राचा (EVM) वापर,

(iii) नामनिर्देशनपत्र व शपथपत्र संगणकामार्फत भरण्याबाबत,

(iv) गुगल डॉक, मोबाईल ॲप, ट्रू व्होटर्स, व्हॉटस् ॲप, इ. संगणकीय प्रणालीचा वापर,

(v) आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणे,

(vi) आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनांवर अंकुश ठेवण्यासाठी करावयाची उपाययोजना,

(vii) पेड न्यूज, पेड सोशल कमेंट, सोशल मीडिया, इत्यादीवर लक्ष ठेवण्यासाठी उपाययोजना,

(viii) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठविणे.

**६. नामनिर्देशनपत्र, शपथपत्र इतर कागदपत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेच्या संगणकीकरणाबाबत**

६.१ उमेदवारांना त्यांच्या उमेदवारीबद्दल खालील कागदपत्रे सादर करावी लागतात :-

(अ) नामनिर्देशनपत्र

(ब) शपथपत्र

(क) आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती, व

(ड) पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्याबाबत "जोडपत्र-१" व "जोडपत्र-२"
(आयोगाचे आदेश क्र-रानिआ/रापनो/२००९/प्र.क्र.४९ (भाग-२)/का.११,
दि.२५/०२/२०१३ नुसार विहित) (लागू असल्यास)

(इ) जात वैधता प्रमाणपत्र- हमीपत्र (नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाचे शपथपत्र)

६.२ राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या दोन बाबींकरिता म्हणजेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्र उमेदवारांना सहज रितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरणे आवश्यक आहे. त्यांनी वेब साईट उघडून त्यामध्ये माहिती भरावी. त्यामध्ये आवश्यक असल्यास दुरुस्ती करुन त्याचे प्रिंट आऊट काढून त्यावर स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. असा भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशनपत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

६.३ सर्व उमेदवारांना नामनिर्देशनपत्र भरण्यास अडचण येऊ नये म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आवश्यकतेप्रमाणे एक किंवा त्यापेक्षा जास्त मदंत कक्षांची (Help Desk) स्थापना करावी व हेल्प डेस्क सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे.

६.४ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे शपथपत्र संगणकाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नमुन्यात भरुन त्याचे प्रिंट आऊट घेऊन स्वत:ची स्वाक्षरी करुन व आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावे. राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२२/का-०५, दि.८/१/२०१५ च्या आदेशानुसार अशी शपथपत्रे स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नाही.

६.५ **राखीव प्रभागातून सदस्य पदाची निवडणूक लढविणाऱ्या व अध्यक्ष पदाची निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.** तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोच पावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत अधिनियमात तरतूद आहे. **या संदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.**

६.६ आवश्यक ती प्रमाणपत्रे व पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्याबाबत नमुना "जोडपत्र-१" व नमुना **"जोडपत्र-२"** व जात वैधता प्रमाणपत्राकरिता हमीपत्र हे स्कॅन (Scan) करून अपलोड किंवा संगणकाच्या मदतीने भरू नये.

६.७ **उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याकरिता महाराष्ट्र नगरपरिषदा निवडणूक नियम १९६६ च्या नियम १७ नुसार घ्यावयाचा अर्ज विहित पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाव्दारे भरावयाचा नाही अथवा ई-मेलव्दारे देता येणार नाही.**

६.८ नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्राचा नमुना खालील नमूद वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे:- https://panchayatelection.maharashtra.gov.in या आज्ञावलीच्या वापराबाबत काही अडचणी आल्यास आयोगाच्या संगणकीकरण शाखेतील नोडल अधिकारी व महाऑनलाईनचे प्रतिनिधी यांच्याशी दूरध्वनी व इ-मेल वर परस्पर संपर्क साधावा.

७. **नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास:-**

आयोगाच्या क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का.०६, दिनांक २७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.५७६/३/२०१३-एसडीआर, दि.३०/०९/२०१३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कार्यवाही करावी. याबाबत सर्व राजकीय पक्षांना माहिती देण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना संबंधित जिल्हाधिकारी यांनी कराव्यात.

८. **नामनिर्देशनपत्र मागे घेणे तसेच बिनविरोध निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत :-**

निवडणुकांचेवेळी उमेदवारी अर्ज भरताना अनेक उमेदवार अर्ज भरतात,परंतु नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्यावेळी एक उमेदवार सोडून अन्य सर्व उमेदवार अर्ज मागे घेतात. अशावेळी तो उमेदवार इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो ही शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे यापुढे असे प्रसंग घडल्यास आयोगास त्याबाबत सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे. याबाबत आयोगाचे क्र. रानिआ/मनपा२००४/प्र.क्र.३७/का.०५, दिनांक २३/१२/२००४ च्या आदेशाचे पालन करावे.

९. **आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी-**

(i) **क्षेत्र** - ज्या जिल्हयामध्ये ४ किंवा ४ पेक्षा जास्त नगरपरिषदा / नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका आहेत त्या संपूर्ण जिल्हयामध्ये आचारसंहिता लागू राहील. जिल्ह्यातील ४ पेक्षा कमी नगर परिषद / नगर पंचायती असतील तर संबंधित नगर परिषद / नगरपंचायतींच्या क्षेत्रापुरतीच आचारसंहिता लागू राहील.

(ii) **आचारसंहितेचा कालावधी**- निवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या दिनांकापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील.

(iii) याबाबत आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का.५, दिनांक १४/१०/२०१६ मधील तरतुदींचे सर्वतोपरी पालन होईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी. आचारसंहितेच्या **अंमलबजावणीबाबत या आदेशात नमूद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास जिल्हाधिकारी** यांनी आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव मार्गदर्शनाकरिता विभागीय आयुक्त यांना पाठवावा. जर विभागीय आयुक्त यांना आवश्यक वाटल्यास तरच प्रस्ताव

मार्गदर्शनार्थ राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा. मुख्याधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आयोगाच्या कार्यालयाकडे आचारसंहितेप्रकरणी परस्पर संदर्भ करु नये.

**१०. खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे-**

निवडणुकीत अवाजवी खर्च व अवैध मार्गाने मतदारांना प्रभावित करण्यासाठी किंवा प्रलोभने देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नवनवीन योजनांबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये चिंता व्यक्त करून त्यावर आळा बसविण्याच्या गरजेबाबत सर्वांचे लक्ष वेधले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमामध्ये राज्य शासनाने दिनांक २ मे, २००८ मध्ये केलेली दुरुस्ती लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने उमेदवार व राजकीय पक्षाच्या खर्चाबाबत क्रमांक रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का-०६, दिनांक १०/०८/२०१५ व दि.१५/१०/२०१६ अन्वये स्पष्ट आदेश काढलेले आहेत. सर्वांनी या आदेशाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

**११. आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी उपाययोजना -**

(i) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक निवडणूक संनियंत्रण समिती स्थापन करण्यात यावी. यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील :-

| <u>अनिवार्य सदस्य</u> | <u>आवश्यकतेप्रमाणे सदस्य</u> |
|---|---|
| ▪ जिल्हा पोलीस अधिक्षक | महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ |
| ▪ मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | महाराष्ट्र राज्य प्रादेशिक परिवहन परिषद,कार्यालय |
| ▪ आयकर विभागाचे अधिकारी | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ▪ विक्रीकर विभागाचे अधिकारी | विद्यापीठे |
| ▪ अबकारी विभाग | जिल्हा माहिती अधिकारी (D.I.O.), इत्यादी. |
| ▪ बँकेचे वरिष्ठ अधिकारी | |

(ii) या समितीवर आवश्यकतेप्रमाणे इतर अधिकारी घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(iii) जिल्हाधिकारी यांनी योग्य त्या अधिकाऱ्याची या समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करावी.

१२. **वरील समितीने करावयाची कार्यवाही –**

१२.१ वरील समितीने आवश्यक तो सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार करून योग्य ती कार्यवाही करावी, उदा :-

(i) **कायदा व सुव्यवस्था राखणे–**

प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ii) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे,

(iii) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या, मद्य (Liquor) इत्यादीच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(iv) प्रत्येक उमेदवार व राजकीय पक्ष यांनी खर्चाबाबतची व्यवस्थित माहिती वेळेवर सादर करणे. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दिनांक १५/१०/२०१६).

(v) रोख रकमांच्या मोठया व्यवहारावर सर्व संबंधित ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(vi) तारण, वित्तीय, हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) यांचे व्यवहार व हालचालींवर लक्ष ठेवणे.

(vii) बँकांमार्फत होणाऱ्या मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

(viii) आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१/का-५,दि.१६/०१/२०१२ प्रमाणे पेड न्यूज, पेड सोशल कमिटी, सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

१२.२ वरील बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे उपाययोयजना करण्यात याव्यात.उदा. :-

(i) **व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक**-(Video Survellience Team)

आचारसंहिता कालावधीमध्ये निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या महत्वाच्या घटना, मिरवणुका, प्रचार फेऱ्या, सभा अथवा आचारसंहितेचा भंग होईल अशा घटनांचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे. अवाजवी खर्चाबाबत किंवा आचारसंहितेचा भंग होणाऱ्या घटनांबाबत या पथकाने निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्वरित विनाविलंब माहिती उपलब्ध करून द्यावी. एखादया प्रकरणी **व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक**-(Video Survellience Team) उपलब्ध होवू न शकल्यास अधिकारी / कर्मचारी **यांनी मोबाईलवर अशा प्रकरणांचे** चित्रिकरण करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांना संबंधित **क्लीपसह अहवाल सादर करावा.**

(ii) **भरारी पथक** (Flying Squad) :

पैशाची व मद्याची अवैध मार्गाने वाहतूक, मतदारांना प्रलोभन ठरतील अशा व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक (Flying Squad) तैनात करण्यात यावे. या पथकाने योग्य ती तपासणी करून आवश्यक त्या वस्तू जप्त कराव्यात व पुढील कायदेशीर कारवाई करावी.

(iii) **चेक पोस्टसाठी पथक** (Statistic Survellience Team)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील महत्वाचे नाके, इत्यादी जेथून मद्याची अवैध वाहतूक तसेच मतदारांना प्रलोभन ठरतील अशा वस्तूंची वाहतूक होऊ शकते अशा ठिकाणी चेक पोस्ट तयार करून वरील पथक नेमावे. या पथकाने योग्य ती तपासणी करून बेकायदेशीर वस्तू जप्त करुन पुढील कायदेशीर कारवाई करावी.

(iv) **तक्रार निवारण कक्ष-**

आचारसंहिता भंगाची तक्रार स्वीकारण्यासाठी व त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे जिल्हास्तर किंवास्थानिक स्वराज्य संस्थानिहाय कंट्रोल रुम / कॉल सेंटरची स्थापना करण्यात यावी. या कंट्रोल रुममध्ये उपलब्ध असलेले दूरध्वनी / मोबाईल क्रमांक यांना योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

(v) वरील तिन्ही पथके व तक्रार निवारण कक्षासाठी जिल्हाधिकारी यांनी पोलीस अधिक्षक यांच्याशी सल्ला मसलत करून योग्य अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करावी. उदा.- नायब तहसिलदार, पोलीस उप निरीक्षक, व्हिडिओग्राफर व शस्त्रधारी पोलीस, इत्यादी. तसेच त्यांना त्यांचे काम व्यवस्थित रितीने करता यावे यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था (वाहनासह) उपलब्ध करून द्यावी.

१३. **मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना -**

(i) नगरपरिषदा/नगर पंचायतींच्या निवडणुकीमध्ये मतदानाची कमी टक्केवारी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सर्व संबंधितांची मदत घेऊन (उदा. विद्यापीठे, महाविद्यालये, उद्योग समूह, अशासकीय संस्था, इत्यादी) मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात यावी.

(ii) जनजागृतीसाठी सर्व प्रकारची उपाययोजना व माध्यमांचा वापर करण्यात यावा. उदा. पारंपारिक व कल्पक योजना, नवीन तंत्रज्ञान, सोशल मीडिया, इत्यादी.

१४. मतदार जनजागृती आणि शिक्षण (Educaton & Voters awareness)

उमेदवारांची माहिती मतदारांना व्हावी म्हणून काही स्वयंसेवी संस्था, विदयापीठे, महाविदयालये इत्यादी. मतदार जनजागृती आणि शिक्षण (Educaton & Voter s awareness) या विषयी काम करतात. अशा संस्था,विदयापीठे किंवा महाविदयालये इत्यादी यांनी संपर्क केल्यास त्यांना माहिती देवून सहाकार्य करावे. तथापि, संबंधित संस्था इ. यांनी राज्य निवडणूक आयोग किंवा निवडणुकीशी निगडित कोणताही अधिकारी इ. यांचा संदर्भ न देता तटस्थपणे काम करावे व मतदारांपर्यंत माहिती पाहोचवावी. कोणताही उमेदवार, व्यक्ती किंवा राजकीय पक्ष यांना मदत होईल असे कोणतेही कृत्य संबंधित संस्था यांना करता येणार नाही. मतदार जनजागृती आणि शिक्षण याअंतर्गत उदा.खालील बाबींचा समावेश असेल.

(i) उमेदवारांची यादी अंतिम झाल्यावर उमेदवाराने भरलेले नामनिर्देशनपत्र व शपथपत्र यामधील माहितीचे विश्लेषण करून प्रकाशित करणे.

(ii) उमेदवाराचे मत दर्शविणारी २-३ मिनिटांची व्हिडिओ क्लिप You Tube इत्यादीवर अपलोड करणे.

१५. निवडणूक निरीक्षक :-

(i) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/२०१६/प्र.क्र.३०/का-०६, दि.१४/१०/२०१६ प्रमाणे निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य निवडणूक निरीक्षक / निवडणूक निरीक्षक नेमण्यात येणार आहेत. त्यांनी इतर कामांबरोबर आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश इत्यादीसाठी केलेल्या / येणाऱ्या उपाययोजनांवरसुध्दा लक्ष ठेवावयाचे आहे.

(ii) त्यांना आवश्यक ती माहिती व सुविधा पुरवाव्यात. ते स्वतंत्रपणे माहिती विभागीय आयुक्तांमार्फत राज्य निवडणूक आयोगाला सादर करतील, त्याकरिता त्यांना सहाय्य करावे.

१६. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मार्कर पेन यांच्या वापराबाबत तसेच पितळी सील पुरवठयाबाबत:-

(i) नगर परिषद व नगर पंचायतीमधील सदस्य पदांसाठी व अध्यक्ष पदाच्या निवडणूका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर घेण्यात येतील. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या वापराबाबत आयोगाचे क्र.एसईसी/जीईएन-२००४/प्र.क्र.२/का-६,दि.१३/०४/२००४ व दि.१६/१०/२००४,

रानिआ-२०१३/प्र.क्र.८/का-१२, दि.२८/१०/२०१३, दि.२६/११/२०१३ व आदेश क्र रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३८/का-६, दि.१४/१०/२०१६ च्या आदेशानुसार कार्यवाही करावी.

(ii) मार्कर पेनने मतदाराच्या बोटाला निशाणी करण्याबाबत आयोगाच्या क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५,दि.१९/११/२०११ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच ही मार्कर पेन वापरण्यायोग्य **विहित मुदतीतील असल्याबाबत** आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

(iii) संबधित विभागीय आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना पितळी सील वेळेत पुरवावेत.

**१७. मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करण्याबाबत :-**

लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांना बीएलओमार्फत फोटो असलेल्या व्होटर स्लीपचे वाटप करण्यात यावे.

**१८. निवडणूकविषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत:-**

(i) राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधीत जिल्हाधिकारी यांनी हे निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करावेत.

(ii) निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत. व तसेच प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबतची माहिती-

(अ) नगरपरिषद / नगर पंचायत वेबसाईटवर प्रसिध्द करावी तसेच

(ब) राज्य निवडणूक आयोगास मोबाईल ॲप्स, फॅक्स व ई-मेलद्वारे तात्काळ पाठवावी.

(iii) राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०१/१२/२००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्रांचा ताबा घेणे, मतदान यंत्रांवर जबरदस्तीने मते नोंदविणे, वगळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे यासारख्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याची दक्षता घ्यावी.

(iv) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठवावी.

१९. निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याबाबत:-

उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आल्यावर संबंधीत निवडणूक अधिनियमातील तरतुदीनुसार सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी विहित कालावधीत पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

२०. इतर

(i) निवडणूक खर्चावर आळा बसविणे आवश्यक असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने सन १९७५ मध्ये खालीलप्रमाणे प्रतिपादित केले आहे.

".... The object of the provision limiting the expenditure is twofold. In the first place, it should be open to any individual or any political party, howsoever small, to be able to contest an election on a footing of equality with any other individual or political party, howsoever rich and well financed it may be, and no individual or political party should be able to secure an advantage over others by virtue of its superior financial strength...

The other objective of limiting the expenditure is to eliminate, as far as possible, the influence of big money in the electoral process. If there was no limit on expenditure, political parties would go all out for collecting contributions... The pernicious influence of big money would then play a decision role in controlling the democratic process in the country..."

(ii) हे सर्व लक्षात घेतासर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील याकरिता निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी कोणत्याही पक्ष व उमेदवार यांची बाजू न घेता (प्रामुख्याने सत्तेमध्ये असलेल्या पक्षाबाबत) निष्पक्षपणे व नियमाप्रमाणे कामे करावीत. तसेच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देणाऱ्या सर्व योजना किंवा कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावेत.

(iii) हयाकरिता राज्य निवडणूक आयोगाने बहुतांशी सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

२१. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खालील निर्णयांकडे जिल्हाधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे :-

(अ) श्री.एल.आर,शिवराम गौडा व इतर वि. टी.एम.चंद्रशेखर सिव्हिल याचिका क्र.४२७२/१९९१- "निवडणूक आयोगास उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाचा तपशील योग्य आहे किंवा कसे हे तपासण्याचे अधिकार आहेत..."

(ब) श्री.एम.एस.गिल रिट याचिका १२९७/१९७७ - उद्भवलेली अनपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी "कायदा / आदेशा" मध्ये तरतूद नसेल तर परिस्थितीनुरुप सुबुध्दीने निर्णय घेण्याचे अधिकार. (आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/अहाका/प्र.क्र.१०/सं.क, दि. ०४/१०/२०१६)

(क) मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.६०६/१९९३ भारत सरकारविरुध्द एम.एस.गिल याप्रकरणी दि.२१/०९/२००० रोजी दिलेल्या निर्णयानुसार, निवडणुकीच्या कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनासह प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का-५, दि.०२/०८/२००६ व भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्र. ४/२००१/जेएस-२, दिनांक ०७/०२/२००१)

२२. **राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक:-**

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल पुढीलप्रमाणे आहेत :-

दूरध्वनी क्रमांक:- २२०४५०७५ / २२०२७७३७ / २२८४६७२०
ई-मेल :- np.stateelectioncommission@gmail.com व sec.mh@gov .in

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,
(स्वाक्षरी)
(ध.मा.कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्रे :- परिशिष्ट १, १-अ; २, २-अ; ३ ,३-अ; ४, ४-अ व ५.

प्रत:-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

२. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग -३३, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२

३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

त्यांना विनंती करण्यात येते की, जिल्हा पोलीस अधिक्षकांना आवश्यकतेनुसार पोलीस दल, जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्याच्या सूचना द्याव्यात.

४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

५. सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.

७. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, (सर्व)

९. सहायक आयुक्त, (संगणक कक्ष), राज्य निवडणूक आयोग,

त्यांना कळविण्यात येते की, संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून ई.व्ही.एम., पेपर सील, पट्टी सील, स्पेशल टॅग व मार्कर पेनची मागणी प्राप्त करुन घ्यावी व आवश्यकतेनुसार त्यांना साहित्य वाटप करण्यासंदर्भातील कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी.

१०. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

११. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.

१२. संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१३. संबंधित मुख्याधिकारी / प्रशासक, नगर परिषद/नगर पंचायत यांना उचित कार्यवाहीसाठी.

१४. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

१५. निवड नस्ती- का-६, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

# अनुसूची

| | | मुदत संपणा-या | | नवीन | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | नगर परिषदा | नगर पंचायती | नगर परिषदा | नगर पंचायती | नगर परिषदा | नगर पंचायती | |
| १ | पालघर | | | | ३ | | ३ | ३ |
| २ | रायगड | ९ | | | | ९ | | ९ |
| ३ | रत्नागिरी | ४ | १ | | | ४ | १ | ५ |
| ४ | सिंधुदुर्ग | ३ | | | १ | ३ | १ | ४ |
| | एकूण | १६ | १ | | ४ | १६ | ५ | २१ |
| ५ | पुणे | १० | | | | १० | | १० |
| ६ | सातारा | ८ | | | ६ | ८ | ६ | १४ |
| ७ | सांगली | ४ | | १ | ४ | ५ | ४ | ९ |
| ८ | सोलापूर | ९ | | | | ९ | | ९ |
| ९ | कोल्हापूर | ९ | | | | ९ | | ९ |
| | एकूण | ४० | | १ | १० | ४१ | १० | ५१ |
| १० | अहमदनगर | ७ | १ | | | ७ | १ | ८ |
| ११ | जळगाव | १२ | | | १ | १२ | १ | १३ |
| १२ | नाशिक | ६ | | | | ६ | | ६ |
| १३ | धुळे | २ | | | | २ | | २ |
| १४ | नंदुरबार | १ | | | | १ | | १ |
| | एकूण | २८ | १ | | १ | २८ | २ | ३० |
| १५ | जालना | ४ | | | | ४ | | ४ |
| १६ | परभणी | ७ | | | | ७ | | ७ |
| १७ | हिंगोली | ३ | | | | ३ | | ३ |
| १८ | बीड | ६ | | | | ६ | | ६ |
| १९ | उस्मानाबाद | ८ | | | | ८ | | ८ |
| २० | नांदेड | ९ | २ | | | ९ | २ | ११ |
| २१ | लातूर | ४ | | | | ४ | | ४ |
| २२ | औरंगाबाद | ५ | | | | ५ | | ५ |
| | एकूण | ४६ | २ | | | ४६ | २ | ४८ |
| २३ | अमरावती | ९ | | | | ९ | | ९ |
| २४ | अकोला | ५ | | | | ५ | | ५ |
| २५ | बुलढाणा | ९ | | | | ९ | | ९ |
| २६ | वाशिम | ३ | | | | ३ | | ३ |
| २७ | यवतमाळ | ८ | | | | ८ | | ८ |
| | एकूण | ३४ | | | | ३४ | | ३४ |
| २८ | वर्धा | ६ | | | | ६ | | ६ |
| २९ | चंद्रपूर | ४ | | | १ | ४ | १ | ५ |
| ३० | गडचिरोली | २ | | | | २ | | २ |
| ३१ | नागपूर | ९ | | | | ९ | | ९ |
| ३२ | गोंदिया | २ | | | | २ | | २ |
| ३३ | भंडारा | ३ | | १ | | ४ | | ४ |
| | एकूण | २६ | | १ | १ | २७ | १ | २८ |
| | एकूण | १९० | ४ | २ | १६ | १९२ | २० | २१२ |

# परिशिष्ट -१

## ( निवडणूक कार्यक्रम टप्पा क्र.- १ )

( राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. ३४/का.६, दि.१७/१०/२०१६ सोबतचे सहपत्र.)
सोबतच्या परिशिष्ट १-अ मध्ये नमूद १४७ नगर परिषदा व १८ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक व
१४७ नगर परिषदांमधील अध्यक्षाच्या थेट निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम, ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१६.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/ संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | १९/१०/२०१६ (बुधवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे देणे व स्विकारणे. | २४/१०/२०१६(सोमवार) ते २९/१०/२०१६ (शनिवार) (स.११.०० ते दु. ०३.०० पर्यंत) |
| ३ | नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याची अंतिम तारीख | २९/१०/२०१६ (शनिवार) दु.३.०० वाजेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छानणी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०२/११/२०१६ (बुधवार) सकाळी ११.०० वाजल्यापासून |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे | ११/११/२०१६ (शुक्रवार) दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | अपील असल्यास | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिस-या दिवशी किंवा तत्पूर्वी |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ६-अ | मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे | २१/११/२०१६ (सोमवार) |
| ६- ब | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | २१/११/२०१६ (सोमवार) पर्यंत |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २७/११/२०१६ (रविवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २८/११/२०१६ (सोमवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ९ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | कलम १९ आणि ५१अ -१अ (९) मधील तरतुदीं नुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध.मा.कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट १ ब

| अ. क्र. | नगर परिषद / नगर पंचायतीचे नाव | वर्ग | मुदत समाप्तीचा दिनांक | अ. क्र. | नगर परिषद / नगर पंचायतीचे नाव | वर्ग | मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पालघर जिल्हा | | | | सातारा जिल्हा | | |
| १ | विक्रमगड | न.पं. | नवीन | ४९ | सातारा | अ | २१-१२-२०१६ |
| २ | तलासरी | न.पं. | नवीन | ५० | फलटण | ब | १८-१२-२०१६ |
| ३ | मोखाडा | न.पं. | नवीन | ५१ | कराड | ब | १८-१२-२०१६ |
| | रायगड जिल्हा | | | ५२ | वाई | क | १८-१२-२०१६ |
| ४ | खोपोली | ब | २२-१२-२०१६ | ५३ | म्हसवड | क | १८-१२-२०१६ |
| ५ | उरण | क | २२-१२-२०१६ | ५४ | रहिमतपूर | क | १८-१२-२०१६ |
| ६ | पेण | क | २२-१२-२०१६ | ५५ | महाबळेश्वर | क | ३०-१२-२०१६ |
| ७ | अलिबाग | क | २२-१२-२०१६ | ५६ | पाचगणी | क | ३०-१२-२०१६ |
| ८ | मुरुड-जंजिरा | क | २२-१२-२०१६ | ५७ | कोरेगाव | न.पं. | नवीन |
| ९ | रोहा-अष्टमी | क | २२-१२-२०१६ | ५८ | मेढा | न.पं. | नवीन |
| १० | श्रीवर्धन | क | २२-१२-२०१६ | ५९ | पाटण | न.पं. | नवीन |
| ११ | महाड | क | २२-१२-२०१६ | ६० | वडुज | न.पं. | नवीन |
| १२ | माथेरान | क | ०१-०१-२०१७ | ६१ | खंडाळा | न.पं. | नवीन |
| | रत्नागिरी जिल्हा | | | ६२ | दहिवडी | न.पं. | नवीन |
| १३ | चिपळूण | ब | २२-१२-२०१६ | | नाशिक जिल्हा | | |
| १४ | रत्नागिरी | ब | २२-१२-२०१६ | ६३ | मनमाड | ब | २५-१२-२०१६ |
| १५ | दापोली न.पंचा. | न.पं. | २२-१२-२०१६ | ६४ | सिन्नर | ब | २५-१२-२०१६ |
| १६ | खेड | ब | २२-१२-२०१६ | ६५ | येवला | ब | २५-१२-२०१६ |
| १७ | राजापूर | क | २२-१२-२०१६ | ६६ | सटाणा | क | २५-१२-२०१६ |
| | सिंधुदुर्ग जिल्हा | | | ६७ | नांदगाव | क | २५-१२-२०१६ |
| १८ | वेंगुर्ले | क | १८-१२-२०१६ | ६८ | भगूर | क | २५-१२-२०१६ |
| १९ | सावंतवाडी | क | १८-१२-२०१६ | | अहमदनगर जिल्हा | | |
| २० | मालवण | क | २४-१२-२०१६ | ६९ | संगमनेर | ब | २६-१२-२०१६ |
| २१ | देवगड-जामसांडे | न.पं. | नवीन | ७० | कोपरगाव | ब | २६-१२-२०१६ |
| | सोलापूर जिल्हा | | | ७१ | श्रीरामपूर | ब | २६-१२-२०१६ |
| २२ | बार्शी | अ | २९-१२-२०१६ | ७२ | शिर्डी न.पं | न.पं. | २६-१२-२०१६ |
| २३ | पंढरपूर | ब | २९-१२-२०१६ | ७३ | राहता | क | २६-१२-२०१६ |
| २४ | अक्कलकोट | ब | २९-१२-२०१६ | ७४ | पाथर्डी | क | २६-१२-२०१६ |
| २५ | करमाळा | क | २९-१२-२०१६ | ७५ | राहुरी | क | २६-१२-२०१६ |
| २६ | कुर्डूवाडी | क | २९-१२-२०१६ | ७६ | देवळाली प्रवरा | क | २६-१२-२०१६ |
| २७ | सांगोला | क | २९-१२-२०१६ | | नंदुरबार जिल्हा | | |
| २८ | मंगळवेढा | क | २९-१२-२०१६ | ७७ | शहादे | ब | २१-१२-२०१६ |
| २९ | मैंदर्गी | क | २९-१२-२०१६ | | धुळे जिल्हा | | |
| ३० | दुधनी | क | २९-१२-२०१६ | ७८ | शिरपूर-वरवाडे | ब | २०-१२-२०१६ |
| | कोल्हापूर जिल्हा | | | ७९ | दोंडाईचा-वरवाडे | ब | २०-१२-२०१६ |
| ३१ | इचलकरंजी | अ | १६-१२-२०१६ | | जळगाव जिल्हा | | |
| ३२ | जयसिंगपूर | ब | १६-१२-२०१६ | ८० | भुसावळ | अ | २५-१२-२०१६ |
| ३३ | मलकापूर | क | १६-१२-२०१६ | ८१ | चोपडा | ब | २५-१२-२०१६ |
| ३४ | वडगाव कसबा | क | १६-१२-२०१६ | ८२ | अंमळनेर | ब | २५-१२-२०१६ |
| ३५ | कुरूंदवाड | क | १६-१२-२०१६ | ८३ | चाळीसगाव | ब | २५-१२-२०१६ |
| ३६ | कागल | क | १६-१२-२०१६ | ८४ | पाचोरा | ब | २५-१२-२०१६ |
| ३७ | मुरगुड | क | १६-१२-२०१६ | ८५ | यावल | क | २५-१२-२०१६ |
| ३८ | गडहिंग्लज | क | १६-१२-२०१६ | ८६ | फैजपूर | क | २५-१२-२०१६ |
| ३९ | पन्हाळा | क | ३०-१२-२०१६ | ८७ | सावदा | क | २५-१२-२०१६ |
| | सांगली जिल्हा | | | ८८ | रावेर | क | २५-१२-२०१६ |
| ४० | इस्लामपूर | ब | २२-१२-२०१६ | ८९ | एरंडोल | क | २५-१२-२०१६ |
| ४१ | विटा | ब | २२-१२-२०१६ | ९० | धरणगाव | क | २५-१२-२०१६ |
| ४२ | आष्टा | क | २२-१२-२०१६ | ९१ | पारोळा | क | २५-१२-२०१६ |
| ४३ | तासगाव | क | २२-१२-२०१६ | ९२ | बोदवड | न.पं. | नवीन |
| ४४ | कवठे-महांकाळ | न.पं. | नवीन | | जालना जिल्हा | | |
| ४५ | कडेगाव | न.पं. | नवीन | ९३ | जालना | अ | २५-१२-२०१६ |
| ४६ | खानापूर | न.पं. | नवीन | ९४ | भोकरदन | क | २५-१२-२०१६ |
| ४७ | शिराळा | न.पं. | नवीन | ९५ | अंबड | क | २५-१२-२०१६ |
| ४८ | पलूस | क | नवीन | ९६ | परतूर | क | २५-१२-२०१६ |

परिशिष्ट १ अ

| अ. क्र. | नगर परिषद / नगर पंचायतीचे नाव | वर्ग | मुदत समाप्तीचा दिनांक | अ. क्र. | नगर परिषद / नगर पंचायतीचे नाव | वर्ग | मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | परभणी जिल्हा | | | | वाशिम जिल्हा | | |
| ९७ | गंगाखेड | ब | २०-१२-२०१६ | १३४ | कारंजा | ब | २६-१२-२०१६ |
| ९८ | सेलू | ब | २६-१२-२०१६ | १३५ | वाशिम | ब | २६-१२-२०१६ |
| ९९ | जिंतूर | ब | २७-१२-२०१६ | १३६ | मंगरूळपीर | क | ३०-१२-२०१६ |
| १०० | मानवत | क | २०-१२-२०१६ | | अमरावती जिल्हा | | |
| १०१ | पाथरी | क | २०-१२-२०१६ | १३७ | अचलपूर | अ | २७-१२-२०१६ |
| १०२ | सोनपेठ | क | २०-१२-२०१६ | १३८ | अंजनगावसुर्जी | ब | २७-१२-२०१६ |
| १०३ | पूर्णा | क | २०-१२-२०१६ | १३९ | वरूड | ब | २७-१२-२०१६ |
| | हिंगोली जिल्हा | | | १४० | चांदूरबाजार | क | २७-१२-२०१६ |
| १०४ | हिंगोली | ब | २९-१२-२०१६ | १४१ | मोर्शी | क | २७-१२-२०१६ |
| १०५ | वसमतनगर | ब | २९-१२-२०१६ | १४२ | शेंदुरजनाघाट | क | २७-१२-२०१६ |
| १०६ | कळमनुरी | क | २९-१२-२०१६ | १४३ | दर्यापूर | क | २७-१२-२०१६ |
| | बीड जिल्हा | | | १४४ | चांदूररेल्वे | क | २७-१२-२०१६ |
| १०७ | बीड | अ | २५-१२-२०१६ | १४५ | धामणगाव | क | २७-१२-२०१६ |
| १०८ | माजलगाव | ब | २५-१२-२०१६ | | बुलढाणा जिल्हा | | |
| १०९ | परळी-वैजनाथ | ब | २५-१२-२०१६ | १४६ | शेगाव | ब | २६-१२-२०१६ |
| ११० | अंबेजोगाई | ब | २५-१२-२०१६ | १४७ | नांदुरा | ब | २६-१२-२०१६ |
| १११ | गेवराई | क | २५-१२-२०१६ | १४८ | मलकापूर | ब | २६-१२-२०१६ |
| ११२ | धारूर | क | २५-१२-२०१६ | १४९ | खामगाव | ब | २६-१२-२०१६ |
| | उस्मानाबाद जिल्हा | | | १५० | मेहकर | ब | २६-१२-२०१६ |
| ११३ | उस्मानाबाद | अ | २५-१२-२०१६ | १५१ | चिखली | ब | २६-१२-२०१६ |
| ११४ | परांडा | क | २५-१२-२०१६ | १५२ | बुलढाणा | ब | २६-१२-२०१६ |
| ११५ | भूम | क | २५-१२-२०१६ | १५३ | जळगाव-जामोद | क | २६-१२-२०१६ |
| ११६ | कळंब | क | २५-१२-२०१६ | १५४ | देऊळगाव राजा | क | २६-१२-२०१६ |
| ११७ | तुळजापूर | क | २५-१२-२०१६ | | वर्धा जिल्हा | | |
| ११८ | नळदुर्ग | क | २५-१२-२०१६ | १५५ | वर्धा | अ | २२-१२-२०१६ |
| ११९ | मुरुम | क | २५-१२-२०१६ | १५६ | हिंगणघाट | अ | २२-१२-२०१६ |
| १२० | उमरगा | क | २५-१२-२०१६ | १५७ | आर्वी | ब | २२-१२-२०१६ |
| | यवतमाळ जिल्हा | | | १५८ | सिंदी | क | २२-१२-२०१६ |
| १२१ | यवतमाळ | अ | २७-१२-२०१६ | १५९ | पुलगाव | क | २२-१२-२०१६ |
| १२२ | दिग्रस | ब | २७-१२-२०१६ | १६० | देवळी | क | २२-१२-२०१६ |
| १२३ | पुसद | ब | २७-१२-२०१६ | | चंद्रपूर जिल्हा | | |
| १२४ | उमरखेड | ब | २७-१२-२०१६ | १६१ | बल्लारपूर | ब | २७-१२-२०१६ |
| १२५ | वणी | ब | २७-१२-२०१६ | १६२ | वरोरा | ब | २९-१२-२०१६ |
| १२६ | घाटंजी | क | २७-१२-२०१६ | १६३ | मूल | क | २७-१२-२०१६ |
| १२७ | आर्णी | क | २७-१२-२०१६ | १६४ | राजूरा | क | २७-१२-२०१६ |
| १२८ | दारव्हा | क | ०४-०१-२०१७ | १६५ | सिंदेवाही | न.पं. | नवीन |
| | अकोला जिल्हा | | | | | | |
| १२९ | अकोट | ब | २७-१२-२०१६ | | | | |
| १३० | बाळापूर | ब | २७-१२-२०१६ | | | | |
| १३१ | मुर्तिजापूर | ब | २७-१२-२०१६ | | | | |
| १३२ | तेल्हारा | क | २७-१२-२०१६ | | | | |
| १३३ | पातूर | क | २७-१२-२०१६ | | | | |

## परिशिष्ट -२

### (निवडणूक कार्यक्रम टप्पा क्र.-२)

**राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३४/का.६, दि.१७/१०/२०१६ सोबतचे सहपत्र.**

**सोबतच्या परिशिष्ट २-अ मध्ये नमूद १४ नगर परिषदांच्या सार्वत्रिक व**

**या १४ नगर परिषदांमधील अध्यक्षाच्या थेट निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम नोव्हेंबर-डिसेंबर-२०१६**

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/ संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | ०७/११/२०१६ (सोमवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे देणे व स्विकारणे. | ११/११/२०१६ (शुक्रवार) ते १९/११/२०१६ (शनिवार) (स.११.०० ते दु. ०३.०० पर्यंत) दि.१२/११/२०१६ ते १४/११/२०१६ या सुट्टयांच्या कालावधीत नामनिर्देशनपत्र देण्यात **येणार** नाहीत व स्विकारली जाणार नाहीत.) |
| ३ | नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याची अंतिम तारीख | १९/११/२०१६ (शनिवार) दु.३.०० वाजेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २१/११/२०१६ (सोमवार) सकाळी ११.०० वाजल्यापासून |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक **अपील नसेल तेथे** | ०१/१२/२०१६ (गुरुवार) दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | **अपील असल्यास** | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिस-या दिवशी किंवा तत्पूर्वी |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ६-अ | मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे | ०८/१२/२०१६ (गुरुवार) |
| ६-ब | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | ०८/१२/२०१६ (गुरुवार) पर्यंत |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | १४/१२/२०१६ (बुधवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १५/१२/२०१६ (गुरुवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ९ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | कलम १९ मधील तरतुदींनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध.मा.कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

| परिशिष्ट-२-अ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | नगर परिषदेचे नाव | वर्ग | मुदत समाप्तीचा दिनांक |
| | पुणे विभाग | | |
| जिल्हा-पुणे | | | |
| १ | बारामती | ब | ०९-०२-२०१७ |
| २ | लोणावळा | ब | १९-१२-२०१६ |
| ३ | दौंड | ब | ०६-०२-२०१७ |
| ४ | तळेगाव-दाभाडे | ब | १९-१२-२०१६ |
| ५ | आळंदी | क | ०६-०२-२०१७ |
| ६ | इंदापूर | क | ०६-०२-२०१७ |
| ७ | जेजुरी | क | ०६-०२-२०१७ |
| ८ | जुन्नर | क | १९-१२-२०१६ |
| ९ | सासवड | क | ०६-०२-२०१७ |
| १० | शिरुर | क | ०६-०२-२०१७ |
| औरंगाबाद विभाग | | | |
| जिल्हा-लातूर | | | |
| ११ | उदगीर | अ | २२-१२-२०१६ |
| १२ | औसा | क | २२-१२-२०१६ |
| १३ | निलंगा | क | २२-१२-२०१६ |
| १४ | अहमदपूर | ब | १४-०२-२०१७ |

## परिशिष्ट -३

### (निवडणूक कार्यक्रम टप्पा क्र.- ३)

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३४/का.६, दि.१७/१०/२०१६ सोबतचे सहपत्र.

सोबतच्या परिशिष्ट ३-अ मध्ये नमूद १

२० नगर परिषदा व २ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक व

२० नगर परिषदांमधील अध्यक्षाच्या थेट निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम, नोव्हेंबर- डिसेंबर,२०१६

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/ संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | १५/११/२०१६ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे देणे व स्विकारणे. | १९/११/२०१६ (शनिवार) ते २५/११/२०१६ (शुक्रवार) (स.११.०० ते दु. ०३.०० पर्यंत) दि.२०/११/२०१६ रविवार या सुट्टिच्या दिवशी नामनिर्देशनपत्र देण्यात येणार नाहीत व स्विकारली जाणार नाहीत.) |
| ३ | नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याची अंतिम तारीख | २५/११/२०१६ (शुक्रवार) दु.३.०० वाजेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २८/११/२०१६ (सोमवार) सकाळी ११.०० वाजल्यापासून |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक **अपील नसेल तेथे** | ०७/१२/२०१६ (बुधवार) दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | **अपील असल्यास** | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिस-या दिवशी किंवा तत्पूर्वी |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ६-अ | मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे | १३/१२/२०१६ (मंगळवार) |
| ६- ब | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | १३/१२/२०१६ (मंगळवार) पर्यंत |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | १८/१२/२०१६ (रविवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १९/१२/२०१६ (सोमवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ९ | **महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे** | कलम १९ आणि ५१अ -१अ (९) मधील तरतुदीं नुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध.मा.कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

| परिशिष्ट-३-अ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | नगर परिषदेचे नाव | वर्ग | मुदत समाप्तीचा दिनांक |
| औरंगाबाद विभाग | | | |
| जिल्हा- औरंगाबाद | | | |
| १ | वैजापूर | ब | २८-१२-२०१६ |
| २ | कन्नड | ब | २८-१२-२०१६ |
| ३ | पैठण | ब | २८-१२-२०१६ |
| ४ | गंगापूर | क | २८-१२-२०१६ |
| ५ | खुल्ताबाद | क | ०९-०२-२०१७ |
| जिल्हा-नांदेड | | | |
| ६ | धर्माबाद | क | २९-१२-२०१६ |
| ७ | उमरी | क | २९-१२-२०१६ |
| ८ | हदगाव | क | २९-१२-२०१६ |
| ९ | मुखेड | क | १७-०२-२०१७ |
| १० | बिलोली | क | १७-०२-२०१७ |
| ११ | कंधार | क | १७-०२-२०१७ |
| १२ | कुंडलवाडी | क | १७-०२-२०१७ |
| १३ | मुदखेड | क | १७-०२-२०१७ |
| १४ | देगलूर | ब | १७-०२-२०१७ |
| १५ | अर्धापूर न.पं. | क | २९-१२-२०१६ |
| १६ | माहुर न.पं | क | २९-१२-२०१६ |
| नागपूर विभाग | | | |
| जिल्हा-भंडारा | | | |
| १७ | पवनी | क | २३-१२-२०१६ |
| १८ | भंडारा | ब | ०६-०२-२०१७ |
| १९ | तुमसर | ब | ०७-०२-२०१७ |
| २० | साकोली | क | **नवीन** |
| जिल्हा-गडचिरोली | | | |
| २१ | गडचिरोली | ब | २७-१२-२०१६ |
| २२ | देसाईगंज | क | २७-१२-२०१६ |

## परिशिष्ट -४
## (निवडणूक कार्यक्रम टप्पा क्र.- ४)

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३४/का.६, दि. १७/१०/२०१६ सोबतचे सहपत्र.
सोबतच्या परिशिष्ट ४-अ मध्ये नमूद ११ नगर परिषदांच्या सार्वत्रिक व या
११ नगर परिषदांमधील अध्यक्षाच्या थेट निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम, डिसेंबर-२०१६ ते जानेवारी-२०१७

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/ संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | ०३/१२/२०१६ (शनिवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे देणे व स्विकारणे. | ०९/१२/२०१६ (शुक्रवार) ते १७/१२/२०१६ (शनिवार) (स.११.०० ते दु. ०३.०० पर्यंत) दि.१०/१२/२०१६ ते १२/१२/२०१६ या सुट्टीच्या कालावधीत नामनिर्देशनपत्र देण्यात येणार नाहीत व स्विकारली जाणार नाहीत.) |
| ३ | नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याची अंतिम तारीख | १७/१२/२०१६ (शनिवार) दु.३.०० वाजेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १९/१२/२०१६ (सोमवार) सकाळी ११.०० वाजल्यापासून |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक **अपील नसेल तेथे** | २९/१२/२०१६ (गुरूवार) दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ५-अ | **अपील असल्यास** | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिस-या दिवशी किंवा तत्पूर्वी |
| ६ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ६-अ | मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे | ०२/०१/२०१७ (सोमवार) |
| ६-ब | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | ०२/०१/२०१७ (सोमवार) पर्यंत |
| ७ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | ०८/०१/२०१७ (रविवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ८ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | ०९/०१/२०१७ (सोमवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| ९ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | कलम १९ मधील तरतुदींनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध.मा.कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

| परिशिष्ट-४-अ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | नगर परिषदेचे नाव | वर्ग | मुदत समाप्तीचा दिनांक |
| | नागपूर विभाग | | |
| जिल्हा-नागपूर | | | |
| १ | कामटी | ब | ०८-०२-२०१७ |
| २ | उमरेड | ब | ०८-०२-२०१७ |
| ३ | काटोल | ब | ०८-०२-२०१७ |
| ४ | कळमेश्वर | क | ०८-०२-२०१७ |
| ५ | मोहपा | क | ०८-०२-२०१७ |
| ६ | रामटेक | क | ०८-०२-२०१७ |
| ७ | नरखेड | क | ०८-०२-२०१७ |
| ८ | खापा | क | ०८-०२-२०१७ |
| ९ | सावनेर | क | ०८-०२-२०१७ |
| जिल्हा-गोंदिया | | | |
| १० | तिरोरा | क | ०६-०२-२०१७ |
| ११ | गोंदिया | अ | ०६-०२-२०१७ |